आत्मदीपो भव !

# रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी

Rambhau Mhalgi Prabodhini

संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र

## शिक्षक क्षमता विकास आणि समुपदेशन कौशल्य - कार्यशाळा अहवाल

दिनांक:- ६ मार्च २०१७

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र तर्फे शनिवार-रविवार, दिनांक ४ व ५ मार्च २०१७ रोजी पिंपरी, पुणे येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या हिंदुस्तान ॲन्टिबायोटिक्स स्कूलच्या माध्यमिक विभागाच्या ५० शिक्षकांसाठी **क्षमता विकास आणि समुपदेशन कौशल्य** या दोन दिवसीय कार्याशाळेचे पिंपरी येथील त्यांच्या शाळेमध्येच आयोजन केले होते. शिक्षकांच्या क्षमता कौशल्यांचा विकास व्हावा आणि त्यांनी संस्थेच्या विकासामध्ये त्यांनी योगदान द्यावे त्याच बरोबर विद्यार्थ्यांच्या बौध्दीक-भावनिक-सामाजिक विकास प्रक्रियेत अधिकाधिक सहभागी होण्यासाठी त्यांना समुपदेशनाची कौशल्ये अवगत करून देण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन केले होते.

सर्व शिक्षकांच्या सामुहिक प्रेरणागीताने कार्यशाळेचा शुभारंभ झाला. कार्यशाळेच्या प्रयोजनाबाबत शाळेचे मुख्याध्यापक **मा. श्री. एकनाथ बुरसे** यांनी माहिती दिली. म्हाळगी प्रबोधिनीचे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी **श्री. मनीष पुराणिक** यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक केले. कार्यशाळेचे उद्घाटन शाळा समितीचे अध्यक्ष **मा. डॉ. सुनिल भंडगे** यांनी करून बीजभाषण केले. त्यानंतर कार्यालय अधीक्षक **श्री. राहुल टोकेकर** यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी **सौ. अनया निसळ** आणि **डॉ. दीपक गुप्ते** या वक्त्यांनी एकत्रीतरित्या चार चर्चासत्रे घेतली. शिक्षकांची समुपदेशनातील भूमिका या चर्चासत्राने सुरवात झाली त्यानंतर शिक्षकाने विद्यार्थ्याचे समुपदेशन करताना सकारात्मक दृष्टीकोन ठेवून विद्यार्थ्याला त्याची समस्या सोडवण्यासाठी सहाय्य कसे करायचे याविषयी वक्त्यांनी साभिनय सांगितले. समुपदेशनामध्ये गुप्तता पाळणे, प्रथम विद्यार्थ्याची समस्या आहे हे मान्य करून तसा विश्वास विद्यार्थ्यामध्ये निर्माण करून त्याला योग्य वातावरणामध्ये समुपदेशन करणे आवश्यक असते हे विविध उदाहरणे देऊन व रोलप्लेच्या माध्यमातून समजावून सांगितले. समुपदेशनातील सर्व Do's & Don'ts विषयी शिक्षकांना मार्गदर्शन केले. मुलांच्या विकासाचे टप्पे, वर्तनसमस्यांचे वर्गीकरण, समुपदेशनाची कौशल्ये, समुपदेशनाचे प्रकार व पध्दती आणि शिक्षकानेच समुपदेशन करणे कसे योग्य आहे याविषयी वक्त्यांनी अतिशय उद्बोधक व उपयुक्त माहिती सांगितली. सर्व चर्चासत्रांमध्ये शिक्षकांचा सहभाग व प्रतिसाद खूप उत्साहवर्धक व सकारात्मक होता. त्याच बरोबर समुपदेशनाची सर्व चर्चासत्रे ही शिक्षक, वक्ते व मुख्याध्यापक यांच्या विविध उदाहरणांसह सहभागात्मक, चर्चात्मक व आनंददायी वातावरणामध्ये घेण्यात आली हे या कार्यशाळेचे वैशिष्ट्य होते.

कार्यशाळेच्या दुस-या दिवशी शिक्षकांना वैयक्तिक स्वोट ॲनालिसीस (SWOT) आणि परस्पर संबंध विषयी वक्ते **श्री. श्याम भुर्के** यांनी मार्गदर्शन केले. स्वोट विषयी मार्गदर्शनामध्ये शिक्षकाची किंवा समुपदेशकाची भूमिका बजावत असतांना स्वत:मध्ये त्यानुसार गुण-वैशिष्ट्ये, कौशल्ये, प्रेरणा, गुणात्मक दर्जा, सकारात्मक दृष्टीकोन त्याच बरोबर तंत्रकौशल्ये

आहेत का? नसतील तर ती का व कशी विससित करावीत? याचे महत्व पटवून दिले. त्यासाठी स्वत:ची शक्तिस्थाने, तृटींचा शोध घेणे गरजेचे आहे. स्वत:मधील शक्तिस्थाने वाढली तर ब-याच संधी आहेत परंतु आपल्यातील तृटी वाढत गेल्या तर त्याचे आपल्या करिअरमध्ये धोकेही निर्माण होतात. त्यामुळे स्वत:चे व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी स्वोट तंत्राचा कायम उपयोग करावा याविशयी भुर्के सरांनी अत्यंत उपयुक्त माहिती सांगितली. शाळेमध्ये काम करत असतांना आपले सहकारी, कर्मचारी, वरिष्ठ, विद्यार्थी व पालक यांच्याबरोबरचे संबंध सकारात्मक ठेवून स्वत:बरोबरच विद्यार्थ्यांचाही व्यक्तिमत्व विकास करावा असेही भुर्के सरांनी त्यांच्या परस्पर संबंध या चर्चासत्रामध्ये सांगितले.

या कार्यशाळेमध्ये **श्री. रामचंद्र डिंबळे** यांनी स्वत:मधील, शालेय जीवनातील तसेच वैयक्तिक जीवनातील संघर्ष व्यवस्थापन आणि त्यामधून निर्माण होणा-या ताणतणावांचे नियोजन योग्यपध्दतीने कसे करावे याविषयी शिक्षकांना मार्गदर्शन केले.

या दोन दिवसीय कार्यशाळेमुळे जीवन कौशल्य व समुपदेशन कौशल्य या विषयाच्या शिक्षकांच्या संकल्पना स्पष्ट झाल्या. त्यांना ही कार्यशाळा खूप उपयुक्त वाटली. विद्यार्थ्यांचे समुपदेशन करतांना कार्यशाळेतील चर्चासत्रांचा खूप उपयोग होईल असेही शिक्षकांनी सांगितले.

कार्यशाळेचा समारोप करतांना शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. एकनाथ बुरसे यांनी वक्त्यांच्या मार्गदर्शनाचा शालेय तसेच वैयक्तिक जीवनामध्ये शिक्षकांनी अवश्य लाभ करून घ्यावा असे आवाहन करून सर्व वक्त्यांचे व म्हाळगी प्रबोधिनीचे कार्यशाळेच्या आयोजनाबद्दल आभार मानले. प्रबोधिनीतर्फे सर्व शिक्षकांना प्रमाणपत्रे प्रदान केली तसेच शाळेतर्फे सर्व तज्ज्ञ वक्त्यांना ग्रंथभेट देण्यात आली.

राहुल टोकेकर
कार्यालय अधीक्षक
रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, पुणे